EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# मूल्यवर्धन 3.0 द्वारा वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेचा परिपोष व शिक्षकांची भूमिका

**डॉ.प्रियंका डफरे**
सहाय्यक प्राध्यापक
श्री .राजाभाऊ जाचक शिक्षण महाविद्यालय, वर्धा

मूल्यवर्धन 3.0 हा कार्यक्रम शांतीलाल मुथ्था फाऊंडेशन द्वारा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2023 व राज्य अभ्यासक्रम आराखडा 2024 यांच्याशी सुसंगत मूल्यशिक्षण देण्याचा संकल्प होय. ज्याचा आवृत्तीच्या सुरुवातीलाच "शालेय शिक्षणाचे अंतिम ध्येय्य हे नेहमी करुणा जबाबदारी आणि शांतता अशा शाश्वत मुल्यांवर आधारित राहिले आहे.कितीतरी संशोधन अभ्यास हेच दाखवून देतात की काळजी, विश्वास आणि आदर या मूल्यांवर आधारित नाते संबंध आणि शाळेतील पोषक मानसिक- सामाजिक वातावरण या बाबी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशात कळीची भूमीका बजावतात. त्यामुळेच मूल्यांवर सस्पष्टपणे देणारे शिक्षण व गुणवत्तापूर्ण अध्यापन यांचे मते जुळल्याने परस्परांना वेढत आणि आधार देत बहरणाऱ्या वेलींसारखेच (डबल हेलिक्स सारखे) असते." असे प्रतिपादन केले आहे. वसुधैव कुटुंबकम ज्याचा अर्थ मानवजातीमधील सर्व लोक एकाच कुटुंबाचा भाग आहेत आणि त्यांनी परस्परांशी करुणा, प्रेम व सहिष्णूतेने वर्तन अभिप्रेत आहे. भारतीय तत्वज्ञानाचा गाभा असलेली आणि जी-20 परिषदेचे ब्रीदवाक्य असलेली संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये तेवढयाच ताकदीने बिंबविणे आवश्यक आहे. यासाठी शासनाकडून तसेच विविध सेवाभावी संस्थांकडून केल्या जाणाऱ्या विविध प्रयत्नातील एक प्रभावी कार्यक्रम म्हणजे मूल्यवर्धन 3.0 ठरेल.

## मूल्यवर्धन 3.0 चे उद्दिष्टये व वसुधैव कुटुंबकम् ची संकल्पना :

समतावादी, समावेशक व बहुविध समाजाच्या निर्मितीसाठी सामाजिक योगदान देतील असे नागरिक शाळांनी घडवावेत. सदर उद्दिष्ट हे वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेकडे नेणारा राजमार्ग होय.

## मूल्यवर्धन 3.0 चे गाभाभूत मूल्ये व 'वसुधैव कुटुंबकम्'


NCF 2023 च्या लोकशाहीवादी दृष्टीकोन आणि स्वातंत्र्याबाबतची बांधिलकी समानता, न्याय व निष्पक्षतेसाठी प्रयत्न विविधता, बहुविधता, समावेशकता स्वीकारताना अंतर्निहीत ऐक्याची जाणीव ठेवणे माणुसकी करुणा, समानुभूती आणि बंधुभाव स्वातंत्र्य व हक्काबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या सेवाभाव या सर्व मुल्यांशी सुसंगत राहुनच वसुधैव कुटुंबकम् हया संकल्पनेत समरुप होता येईल.

## मूल्यवर्धन 3.0 द्वारा क्षमता विकसन व 'वसुधैव कुटुंबकम्'

'स्व' जाणीव आणि 'स्व' व्यवस्थापन ,जबाबदारीने निर्णय घेणे, इतरांविषयी काळजी घेणे सुसंवादी नातेसंबंध पर्यावरणाविषयी काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान देणे. या सर्व क्षमता सामाजिक भावनिक अध्ययनासंदर्भात जागतिक पातळीवर मान्यता मिळालेल्या CASEL आराखडयाच्या आधारे निश्चित केल्या आहे. या सगळयांतून वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेचा परिपोष करणाऱ्या क्षमता संवर्धित करणे सहज शक्य होईल.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेच्या परितोषासाठी मूल्यशिक्षण प्रतिमान (मॉडेल)




## राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2023 मध्ये पायाभूत स्तरावरील SEED विषयक उद्दिष्टये व 'वसुधैव कुटुंबकम' ची रुजवणूक.

भावनिक बुध्दीमत्ता म्हणजेच आपण भावना समजून घेवून यांचे व्यवस्थापन करता येणे आणि सामाजिक संकेतांच्या चौकटीत त्यांना सकारात्मक प्रतिसाद देता येणे.

उत्पादक आणिसेवाकार्याविषयी सकारात्मक वृत्ती.

नैसर्गीक पर्यावरणाविषयी सकारात्मक आदर या **SEED** उद्दिष्टाद्वारा विद्यार्थ्यात सेवामूल्य, उत्पादकतेचे मूल्य, सकारात्मक वृत्ती व पर्यावरणीय आदर या सारख्या मूल्यांच्या परिपोषातूनच वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेचा परिपोष करणे सहज शक्य होईल.

अध्यापन पद्धती ----- अभ्यासक्रम उद्दिष्ट्ये------ क्षमता-------मूल्य

याप्रमाणे वसुधैव कुटुंबकम मुल्यवर्धन उपक्रमांची रचना करावी लागेल.

## वसुधैव कुटुंबकम या व्यापक तत्वाच्या रुजवणूकीबाबत शिक्षकांची भूमिका व मते :

वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना नसून एक व्यापक तत्व आहे ते रुजविण्याचे कार्य करणार सक्रीय घटक म्हणजे शिक्षक होय. तेव्हा त्यांचा दृष्टीकोन जाणून घेणे या दृष्टीने सदर लेख सादर करतांना विविध शिक्षकांची मते मागविण्यात आली त्यातील काही ठळक मुद्दे पुढील प्रमाणे. "वसुधैव कुटुम्बकम्" म्हणजे संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे. ही भारतीय तत्त्वज्ञानातील मानवतावादी, सहअस्तित्ववादी व सर्वसमावेशक संकल्पना असून आजच्या जागतिकीकरण, बहुसांस्कृतिक समाज व पर्यावरणीय संकटांच्या पार्श्वभूमीवर ती अधिकच महत्त्वाची ठरते. विद्यार्थ्यांमध्ये ही संकल्पना रुजवण्यासाठी अभ्यासक्रमाबरोबरच विविध अभ्यासपूरक कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे.

## माध्यमिक शिक्षणाद्वारा "वसुधैव कुटुम्बकम्" ची रुजवणूक

### अभ्यासक्रमाद्वारे रुजवणूक

### भाषा विषयांतून

मराठी/हिंदी/संस्कृत/इंग्रजी साहित्यातील कथा, कविता, निबंधांद्वारे मानवता, करुणा, बंधुता यांचे मूल्य.

अनुवाद, वाचन-चर्चा, लेखनकार्यांतून विविध संस्कृतींचा आदर.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

### समाजशास्त्र व इतिहास

विविध धर्म, संस्कृती, राष्ट्रांतील सहअस्तित्वाची उदाहरणे.

जागतिक शांतता चळवळी, संयुक्त राष्ट्रांचे कार्य, मानवाधिकार.

### विज्ञान व पर्यावरण

पर्यावरणीय संतुलन, जैवविविधता, शाश्वत विकास.

"पृथ्वी आपले कुटुंब" ही भावना बळकट करणे.

### नैतिक शिक्षण/मूल्यशिक्षण

सहिष्णुता, समता, सहकार्य, सामाजिक बांधिलकी.

प्रकल्प, केस-स्टडी, समूहचर्चा.

### अभ्यासपूरक (Co-curricular) कार्यक्रम

### सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम

विविध संस्कृतींचे उत्सव, लोककला प्रदर्शन, आंतरराष्ट्रीय दिवस साजरे करणे.

"एक भारत श्रेष्ठ भारत" उपक्रम.

### सेवा व स्वयंसेवी उपक्रम

स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे.

वृद्धाश्रम, अनाथालय भेटी—सेवेची भावना.

### वादविवाद, निबंध, पोस्टर स्पर्धा

विषय: जागतिक बंधुता, शांतता, पर्यावरण संरक्षण.

विचारमंथन व सर्जनशील अभिव्यक्ती.

### खेळ व समूहकार्य

संघभावना, नियमपालन, परस्पर आदर.

बहुसांस्कृतिक संघांतील सहकार्य.

### अध्यापन-पद्धती व मूल्यांकन

अनुभवाधिष्ठित शिक्षण: प्रकल्प, फील्ड-वर्क, समुदायाशी संवाद.

समूहकार्य व सहकारी शिक्षण: विविधतेतून एकता अनुभवणे.

सातत्यपूर्ण मूल्यांकन: वर्तन, सहभाग, सामाजिक संवेदनशीलता यांवर भर.

### निष्कर्ष

अभ्यासक्रमातील आशय आणि अभ्यासपूरक उपक्रम यांचा समन्वय साधून "वसुधैव कुटुम्बकम्" ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या विचार, भावना व कृतीत रुजवता येते. यामुळे विद्यार्थी जागतिक नागरिक म्हणून घडतील—मानवता, सहिष्णुता, पर्यावरण-जाणीव आणि शांततेची मूल्ये अंगीकारतील.

### आंतरराष्ट्रीय दिन

आंतरराष्ट्रीय दिन हा जागतिक पातळीवर विशिष्ट विषयांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी साजरे केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघ व इतर आंतरराष्ट्रीय संस्था विविध सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय व मानवी मूल्यांशी संबंधित दिवस निश्चित करतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

या दिवसांच्या माध्यमातून शांतता, राष्ट्र राष्ट्रांमधील जपवणूक, मानवाधिकार, पर्यावरण संरक्षण, आरोग्य, शिक्षण आणि जागतिक बंधुभाव यांचा संदेश दिला जातो. शाळेत या दिनांचे आयोजन केल्याने विद्यार्थ्यांमध्ये जागतिक जाणीव, सामाजिक जबाबदारी आणि आंतरराष्ट्रीय भावना जागृत होऊन वसुधैव कुटुंबकम् ही भावना विकसित होते.

## विविध राज्य व देशांचे सादरीकरण

हा शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतो. या उपक्रमातून विद्यार्थी भारतातील तसेच जगातील विविध राज्ये व देशांची संस्कृती, भाषा, वेशभूषा, परंपरा, अन्न व उत्सव यांची माहिती सादर करतात. नृत्य, गीत, भाषण, पोस्टर व प्रदर्शनाच्या माध्यमातून सादरीकरण केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव, सहिष्णुता व एकतेची भावना निर्माण होते. वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेचा प्रत्यक्ष चालीरीती परंपरेला जपवणूक व  अनुभव विद्यार्थ्यांना मिळतो.

## वृद्धाश्रम व अनाथालय भेट

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा सामाजिक व मूल्यशिक्षणाचा उपक्रम आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सहानुभूती आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होते. समाजातील वृद्ध व्यक्ती व अनाथ मुले अनेकदा एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक आधाराच्या अभावाला सामोरे जातात. अशा वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेला वेळ, प्रेम आणि आपुलकी त्यांच्यासाठी अमूल्य ठरते. या भेटीदरम्यान विद्यार्थी वृद्धांशी संवाद साधतात, त्यांच्या जीवनातील अनुभव ऐकतात आणि त्यांच्या भावना समजून घेतात. अनाथालयात मुलांबरोबर खेळणे, गोष्टी सांगणे, गाणी म्हणणे यामुळे मुलांमध्ये आनंद आणि आत्मविश्वास निर्माण होतो. काही वेळा विद्यार्थी भोजनदान, पुस्तके, अन्नधान्य, कपडे, खेळणी किंवा आवश्यक वस्तू देऊन मदत करतात. यामुळे सेवाभाव आणि दानशूरतेची भावना वाढते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. समाजातील प्रत्येक घटक आपला आहे, ही भावना दृढ होते. अशा भेटींमुळे विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे तर नैतिक व भावनिकदृष्ट्याही सक्षम नागरिक बनून.विद्यार्थ्यांच्या मनात कार्यक्षम  सहानुभूती तयार  होतात.

## प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमात वसुधैव कुटुंबकम्'ची रुजवणूक

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात मानवी जीवन अधिक गतिमान, स्पर्धात्मक व तंत्रज्ञानाधिष्ठित होत असतांना मानवी मूल्ये, सामाजिक सलोखा, सहिष्णूता, विश्वबंधुत्व यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक झाले आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही प्राचीन भारतीय तत्वज्ञानावर आधारित संकल्पना 'संपूर्ण विश्व एकच कुटुंब आहे.'असा उदात्त विचार सहअस्तित्वाच्या व परस्पर आदराच्या मूल्यांना बळकटी देणारी आहे. विद्यार्थीदशा ही व्यक्तिमत्व विकासाची अत्यंत महत्वाची व्यवस्था असल्यामुळे या टप्प्यावरचे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, जागतिक नागरीकत्व, पर्यावरण संवर्धन, सांस्कृतिक विविधतेचा आदर व मानवतावादी दृष्टीकोन रुजवणे गरजेचे आहे. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) हे धोरण भारतीय परंपरा, मूल्ये व आधुनिक गरजा यांचा समन्वय साधणारे असून "वसुधैव कुटुंबकम" या संकल्पनेचा विचार अप्रत्यक्षपणे पण ठोसपणे प्रतिबिंबित करते. याद्वारे मूल्याधिष्ठित शिक्षण, जागतिक नागरिकत्व, पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास, सर्वसमावेशक व समान शिक्षण, बहुभाषिकता व सांस्कृतिक आदर इत्यादी संदेश विद्यार्थ्यांमध्ये रुजवले जातात. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमात 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना रुजवण्याचा पायाच आहे. कारण या वयात मुले अनुकरणातून शिकतात, त्यांच्यावर कथा, चित्रे, खेळ यांचा प्रभाव जास्त असतो, त्यांना चांगल्या-वाईटाची ओळख देखील याच वयात होते. प्राथमिक अभ्यासक्रमातील भाषा, गणित, इंग्रजी, परिसर अभ्यास, खेळ-करु-शिकू आणि संपूर्ण महाराष्ट्रात राबविल्या जाणाऱ्या 'मूल्यवर्धन 3.0' या मधून देखील अप्रत्यक्षपणे ही संकल्पना रुजवल्या जात आहे. इयत्ता पहिली मधील भाषा (मराठी) या विषयातील मी या घरातून मी व माझे कुटुंब, राधाचे कुटुंब या पाठामधून स्व जाणीव, सामाजिक नागरिकत्व हया मूल्यांची ओळख विद्यार्थ्यांना होते. English

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

विषयातील Traffic signals, The ant and the pigeen या सारख्या पाठातून व विविध कृतीमधून सामाजिक नियम व सहिष्णूता ही मूल्ये विकसित होतात. इयत्ता 2 री मध्ये मराठी भाषेतील 'देवा तुझे किती' या ग.ह. पाटील लिखित गाण्याच्या शेवटल्या कडव्यातील पुढील दोन ओळींचा उल्लेख येथे आवर्जून करावासा वाटतो – "इतके सुंदर जग तुझे जर" किती तू सुंदर असशील" या गाण्यातील निसर्गाचे वर्णन, त्याकरीता निसर्ग निर्मात्याने संपूर्ण विश्वात केलेली रंगाची उधळण – हयाचे वर्णन विद्यार्थ्यांना संपूर्ण विश्वाची जाणीव करुन देते. इयत्ता 3 री मधील 'एकदा गंमत झाली' या पाठातील मनुली तिचे भावविश्व उलगडतांना ती म्हणते "खरी नदी मात्र माझ्यासारखी कशीही धावते. ही पान म्हणूनच मला मघाशी काहीतरी सांगत होती" अशा वाक्यातून निरागसता दिसतेच, त्यासोबतच पर्यावरण संवर्धन, मानवतावाद दृष्टिकोन देखील उद्‌धृत होती. तसेच संपूर्ण महाराष्ट्रभर राबविल्या जाणाऱ्या मूल्यवर्धन 3.0 या उपक्रमातून स्व-जाणीव, वैयक्तिक जबाबदाऱ्या, नातेसंबंध, सामाजिक जाणीव व जबाबदाऱ्या असे स्व पासून सामाजिक क्षेत्रापर्यंत विस्तारणारे आहेत हया उपक्रमांमधून विद्यार्थी जोडी चर्चा, गट चर्चा, सादरीकरण अशा विविध पायऱ्यांमधून आपले मत व्यक्त करतात. त्यामुळे हया उपक्रमांतून सर्वसमावेशकता, सांस्कृतिक आदर या मूल्यांची रुजवणूक होते. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच सहशालेय उपक्रमांमधून देखील वसुधैव कुटूम्बकम ही संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते.

**'मुक्त चित्र रेखाटन'** या उपक्रमात विद्यार्थी त्यांच्या मनाप्रमाणे चित्र रेखाटन व रंग भरण करतात. त्यामुळे त्यांच्या मनातील भाव कागदावर उतरतात. त्यांचे भावविश्व उलगडते.

**'माझे रोप'** – या उपक्रमात विद्यार्थी त्यांच्या वाढदिवसाला शाळेत रोप लावतात व त्याचे संगोपन करतात त्यातून पर्यावरणीय जाणीव विद्यार्थ्यांना होते.

**Eco Bricks** – प्लास्टीक प्रदूषण रोखण्याकरीता Eco Bricks बनवून त्याचा उपयोग सुशोभना करीता केला जातो. यामुळे प्लास्टीक Bottle व प्लास्टीक मुक्त परिसर होतो, सौंदर्यीकरण दृष्टी विस्तारते. याचप्रमाणे 'लेक वाचवा अभियान' बहुभाषिक उपक्रम, पाणी वाचवा, Best from waste, असे अनेक सहशालेय उपक्रमातून सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये होते. तसेच वादविवाद, प्रश्नमंजुषा, निबंध लेखन, समूह चर्चा प्रकल्प कार्य, सेवा उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम स्वच्छता मोहिम व विविध कार्यशाळा अभ्यासपूरक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना जाणीव होते. एकूण पाहता अभ्यासक्रम व विविध अभ्यासपूरक कार्यक्रमांच्या माध्यमातून 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात दृढपणे रुजवता येते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी केवळ ज्ञानसंपन्नच नव्हे तर संवेदनशील जबाबदार व मानवतावादी नागरीक म्हणून घडतो. भारतीय संस्कृतीची महानता दर्शविणारी महत्वाची संकल्पना "वसुधैव कुटुम्बकम" ही विचारधारा समग्र विश्वाबद्दलची करुणा व कृतज्ञता याचे दर्शन घडवते. विद्यार्थी दशेमध्ये या संस्कारांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये होणे ही काळाची गरज आहे. त्याकरीता त्याची प्राथमिक सुरवात प्रार्थना, पसायदान च्या माध्यमातून करण्यात येते. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात दैनंदीन समाज जीवनात कृतज्ञतेचा भाव निर्माण व्हावा यासाठी समाजातील प्रत्येक घटकांचे महत्व त्यांना पटवून देणे गरजेचे आहे. उदा. नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन प्रदुषण नियोजन जातीवाद, भाषावाद, प्रांतवाद, मानसामांसांमधील भेद दुर करण्यासाठी दुसरा दुसरा नसून तो माझा दैवी भाऊ आहे. याची जाणीव करवून देणे. विद्यार्थ्यांना सामाजीक स्तरावर सेवाभावी कार्यक्रमात सहभागी करणे संस्कृत भाषेतील श्लोक पठण करुन घेणे आणि त्याचे मराठी भाषांतर करुन समजावणे. संस्कृत भाषा कार्यक्रमात वसुधैव कुटुम्बकम संकल्पनेचा समावेश करणे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष जागरुकता निर्माण होईल त्याच बरोबर सामाजिक समरसता आणि सांस्कृतिक विकास होईल. "एक पृथ्वी, एक कुटूंब, एक भविष्य" असा विदारक दृष्टीकोण निर्माण करुन नैतिक मूल्यांची रुजवणूक करतो 'तत्वज्ञान' शिकवणे व सहानुभूती,सहकार्य, आणि शाश्वततेचे महत्व अधोरेखीत केले पाहीजे. इतरांच्या कल्याणाचा विचार करण्यास, हवामान बदल, शाश्वत विकास, शांतता (जागतिक) आणि मतभेदांची सहीष्णूता यासह

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

विविध मुद्यांवर जागतिक एकता आणि जबाबदारी वाढविण्यास प्रोत्साहीत करते, वसुधैव कुटुम्बकम केवळ मानवाशी संबंधीत नाही तर सर्व जीवसृष्टीचा समावेश करते.

## संदर्भ

मुल्यावर्धन ३.० माहितीपुस्तिका व प्रत्यक्ष शिक्षक मातावली